# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.३०/०५/२०१८

## दि.२९/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३६८/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | मेघराज साळवे,वय-४६ वर्षे,रा.घरकुल चिखली,पुणे |
| **आरोपी** | कृष्णा गजानन साळुंखे,वय-३६ वर्षे,रा.घरकुल हौसिंग सोसायटी,चिखली पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०५/२०१८ रोजी २२/३० वा. शरदनगर गल्ली क्र.७ चे जवळ मनोहर वॉशिंग ॲन्ड सर्व्हिस सेंटर समोर सर्व्हिस रोडवर शरदनगर,चिखली,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा विशाल मेघराज साळवे,वय-२० वर्षे,रा.ओमकार हौसिंग सोयासटी,घरकुल,चिखली,पुणे हा मोटार सायकलवर पाठीमागे बसुन जात असताना,नमुद ठिकाणी दुचाकीवरून खाली ऊतरत असताना,यातील नमुद टेम्पो चालकाने त्याचे ताब्यातील टेम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी विशाल साळवे यास यांस समोरून जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून, त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (फिर्यादी यांची मानसिक स्थिती ठिक नसल्याने त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, योगेश आव्हाड ९९२३७९७१०४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १०५/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | चिन्मय देशमुख,वय-२२,रा.कसबा पेठ,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे नोव्हेंबर २०१७ ते दि.०२.०३/२०१८ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फेसबुक या सोशन वेबसाईटवर हॉटेल मॅनेजमेंट जॉब्स या ग्रुपवर हॉटेल मॅनेजमेंटची जागा असल्याची जाहिरात टाकुन,फिर्यादी यांना मलेशिया येथे नोकरी लावण्याचे अमिषाने वेग-वेगळया कारणाकरीता बँकेचे खात्यावर एकुण ३,०९,३१५/- रूपये भरण्यास सांगुन,फिर्यादीस नोकरीस न लावता त्यांची नमदु रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) आर.बी.चव्हाण ८६०५६०९०९० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४६४/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२६,रा.ज्योतीबानगर,काळेवाडी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०१८ रोजी दुपारी १२/४५ वा.अमरदिप कॉलनी क्र.२,काळेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मैत्रीणीसह पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र २०,०००/- रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, अभिजीत जाधव ८२७५८४०३३१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १५८/१८,भादविक ३६४(अ),३८६,३२३,२९४,५०४,५०६,३४,महाराष्ट्र सावकारी अधिनियम १९४६ चे कलम ३२(ब) प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३६ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | १.एक महिला,वय-३९,रा.माळवाडी,हडपसर,पुणे (अटक) व इतर दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०१८ रोजी २१/०० वा. ते दि.२९/०५/२०१८ रोजी ०२/०० वा.पर्यंत तळजाई बस स्टॉप व मोहननगर धनकवडी,पुणे येथील मोकळ्या मैदानात तसेच त्यापुर्वी वेळोवेळी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी यातील नमुद महिला हिचेकडुन व्याजाने घेतलेल्या पैशाच्या कारणा वरून इतर इसमांनी फिर्यादी यांचे मुलास जबरदस्तीने मोहननगर येथील मोकळ्या मैदानात नेवुन,तेथुन फोनवरून फिर्यादीस शिवीगाळ करून,त्यांनी आत्ता पैसे आणुन दिले नाहीतर त्यांचे मुलास जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे मुलास हाताने व कमरेच्या पट्ट्याने मारहाण केली. तसेच फिर्यादी यांनी व्याजाने घेतलेले पैसे तीस परत देऊन सुध्दा तीने फिर्यादी यांचेकडे व्याजाच्या पैशांची मागणी करुन,त्यांना दमदाटी करून आणखीन व्याजाच्या पैशाची मागणी करीत आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, सी.एम.मोरे ९८७०३२७७०० |

## दि.३०/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे २०१/१८,भादविक ३०२,३४,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | प्रशांत वीर,वय-४४ वर्षे,रा.चिंचवडगाव,पुणे |
| **आरोपी** | १.रणजीत बापु चव्हाण,रा.वेताळनगर वसाहत,चिंचवड,पुणे व इतर चार इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०५/२०१८ रोजी २३/१५ वा.जयहिंद बँकेच्या खाली कजरी मॅचींग सेंटर ॲण्ड सारीज दुकाना समोर चाफेकर चौक,चिंचवड,पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचा भाचा आकाश उर्फ रायबा तानाजी लांडगे,वय-२४ वर्षे,धंदा-भाजीपाला विक्री,रा.पागेची तालीम जवळ,चिंचवडगाव,पुणे यास पुर्वीच्या कोणत्यातरी वादावरुन त्यांचेकडील कोयता व रॉडने आकाश यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे दोन्ही पायावर व कमरेच्या खाली पाठीमागील बाजुस वार करुन तसेच सिमेंटची कुंडी व गट्टु त्याचे डोक्यात मारुन,त्यास गंभीर जखमी केले असताना, आकाश याचेवर उपचार चालु असताना,उपचारा दरम्यान तो मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.बी.सोडनवर |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**